# वूडपेकर फिल्म फेस्टिव्हलमध्ये महाराष्ट्राची सरशी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

पर्यावरण, संस्कृती, आरोग्य आणि जीवनशैलीचे विविध पैलू उलगडण्यासाठी सीएमएसआर फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या 'वूडपेकर फिल्म फेस्टिव्हल' मध्ये यंदा महाराष्ट्राचे पारडे जड झाले आहे. विविध राज्यातून आलेल्या लघुपटांमधून महाराष्ट्रातील १४ लघुपटांची महोत्सवासाठी निवड झाली आहे. यात पुण्यातील चार लघुपटांचा समावेश आहे. येत्या १९ ते २१ डिसेंबर दरम्यान इंडियन हॅबिटॅट सेंटरमध्ये हा महोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

भारतीय चित्रपटाला शंभर वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त हा महोत्सव आयोजित करण्यात आला असून, आपल्याकडील संस्कृती, परंपरा आणि पर्यावरणावर आधारित लघुपटांना प्रोत्साहन देणे, या विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यासाठी केलेल्या आवाहनाला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, यातील ४५ लघुपटांची महोत्सवासाठी निवड करण्यात आली आहे. यातील १४



## चौदा लघुपटांची निवड

महाराष्ट्रातील, १३ लघुपट हे दिल्लीतील आहेत. याशिवाय पश्चिम बंगाल, तमिळनाडू, गुजरात, ओडिशा, केरळमधील लघुपटांचाही यात समावेश आहे. कुणाल वर्मा यांनी लघुपटांचे परीक्षण केले आहे, अशी माहिती महोत्सवाचे संयोजक नरेंदर यादव यांनी दिली.

पुण्यातील 'ज्योतिर्गमय- फ्रॉम डार्कनेस टू लाइट', 'दावा-रोप' , 'सीकिंग ए स्पेस कॉल्ड पीस' आणि 'लीला' हे चार लघुपट महोत्सवात प्रदर्शित होणार आहेत. इपशिता तारा दास यांनी दिग्दर्शित केलेल्या 'लीला' या लघुपटात प्राणीप्रेमी लीला परुळेकर यांचा जीवनप्रवास आणि पाळीव प्राण्यांसाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. माझ काझमी दिग्दर्शित 'सीकिंग ए स्पेस कॉल्ड पीस' या लघुपटात स्त्रीभ्रूण हत्येच्या विरोधात सुरू असलेल्या महिलांच्या लढ्याचे वास्तव उलगडण्यात आले आहे. 'दावा' हा लघुपट आशुतोष भोसेकर या विद्यार्थ्याने दिग्दर्शित केला असून ग्रामीण भागात राहणाऱ्या तान्या या तरुणावर आधारित आहे. गौरी वारूडी यांनी दिग्दर्शित केलेली 'ज्योतिर्गमय- फ्रॉम डार्कनेस टू लाइट' या लघुपटात शैक्षणिक हक्कांपासून वंचित राहणाऱ्या अनाथ मुलांसाठी झटणाऱ्या व्यक्तींचे प्रयत्न दाखविण्यात आले आहेत, असे यादव यांनी सांगितले.